REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# '' इयत्ता आठवी च्या विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी राबविलेले उपकम ''

रूपाली जानकीराम नामेवार[1] , डॉ. व्ही.एन.निळेकर[2]
[1]संशोधक , स्व.रा.ति.म. विद्यापीठ,नांदेड.
[2] संशोधन मार्गदर्शक , शासकीय अध्यापक महाविद्यालय,परभणी

## प्रास्ताविक :—



सध्याच्या स्पर्धेच्या युगात जीवन अत्यंत गतिमान, गुंतागुंतीचे व विलक्षण धकाधकीचे बनले आहे. सामान्य माणसासमोर नाविन्यपूर्ण व आकर्षित अशी विविध आव्हाने सतत उभी राहत आहे. आज कोणत्याही क्षेत्रात पूर्व परीक्षा, फ्रेश परीक्षा, कौशल्य सादरीकरण, चाचण्या, तोंडी मुलाखती, अंतिम परीक्षा अशा विविध सामान्य ज्ञानात भर घालणा—या व विद्यार्थ्यांची सामान्य ज्ञानचाचणी, कौशल्य, समयसुचकता, निर्णयक्षमता, अचुकता आत्मप्रकटीकरण यांची पडताळणी करणा—या स्पर्धा वाढत आहेत. अशा परिस्थितीत समर्थपणे, समाधानाने व अष्टपैलू व्यक्तिमत्व घडविण्यासाठी, जीवनाच्या प्रत्येक स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त करण्यासाठी शिक्षकांनी विशेष प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. विविध ज्ञानवर्धनात्मक गुणांची व कौशल्यांची विद्यार्थ्यामध्ये रूजवणूक करता यावी म्हणून विद्यार्थ्यामध्ये सामान्यज्ञान वाढविण्यासाठी शासन स्तरावर विविध उपकमांचे आयोजन करण्यात आले.

जालना जिल्हयांतर्गत इयत्ता 5 वी व 8 वी वर्गांना शिष्यवृत्ती परीक्षा ही सन 2014 पासून सुरू झाली आहे. यातही विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान हाच पाया मुख्य मानला गेला आहे. म्हणून प्रस्तुत विषयात संशोधकाने शाळा स्तरावर लघुसंशोधन केले आहे. यात जालना जिल्हयांतर्गत इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान वाढविण्यासाठी काही उपकम राबविले.

### ✸संशोधनाची उद्दिष्टे :—

जालना जिल्हयांतर्गत इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांची सामान्यज्ञानांची सद्यस्थिती अभ्यासणे.

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी विविध उपकम तयार करणे.

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी विविध उपकम राबविणे.

विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी राबविलेल्या उपकमांची परिणामकारकता तपासणे.

### ✸गृहितके :—

स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी सामान्यज्ञान आवश्यक आहे.

सर्व विषयांमधून विद्यार्थ्यांचा बौद्विक विकास व्हावा, हे अपक्षित आहे.

सामान्य ज्ञान वाढण्यिासाठी शालेय स्तरावरूनच विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.

### ✸परिकल्पना :—

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासासाठी विविध उपकम राबविल्यास विद्यार्थ्यांमध्ये सामान्य ज्ञानाची वाढ होईल.

### ✸संशोधनाची निगडीत चले :—

स्वाश्रयी चल : सामान्यज्ञान अद्यावत ठेवण्यासाठी येणा—या अडचणींवर राबविले जाणारे विविध उपकम.

### ✸व्याप्ती :—

1. जालना जिल्हयातील इयत्ता आठवीच्या वर्गातील विद्यार्थी व त्यांचे

विषयवार सामान्यज्ञान या घटकांवर व्याप्त आहे.

2. 2019 या वर्षातील असून सामान्य ज्ञान वाढण्यिासाठी उपक्रमांची अंमलबजावणी यात यासाठी व्यापक आहे.

## ✸ मर्यादा :–

1. प्रस्तुत लघुसंशोधन हे जालना जिल्हयांतील इयत्ता आठवीच्या वर्गापुरतेच मर्यादित असुन सामान्य ज्ञान वाढीसाठी अध्यापन उपक्रम अंमलबजावणीच्या क्षेत्रापुरतेच मर्यादित आहे.
2. 2018 –2019 या शैक्षणिक वर्षपुरतेच मर्यादित असून 1 जि.प्र.,1 खाजगी संस्था, 1 इंग्रजी माध्यम शाळा या तीन शहरातील प्रत्येकी 5,5 विद्यार्थी पुरतेच मर्यादित आहे.

## ✸ संशोधन पद्वती :–

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रायोगिक संशोधन पद्वतीची निवड केली असून यात एकल गट अभिकल्पाची निवड करण्यात आली आहे.

## ✸ साधने :–

प्रस्तुत संशोधनासाठी चाचणी या तंत्राची निवड केली असून कार्यात्मक अभिकत्याद्वारे पूर्व चाचणी – उपक्रम – उत्तर चाचणी अशी योजना केली.

## ✸ जनसंख्या व नमुना निवड :–

1 जि.प.शाळेतील इयत्ता आठवीचे 50 विद्यार्थी, खाजगी शाळेचे 50 विद्यार्थी व एका इंग्रजी माध्यमांचे 50 विद्यार्थी अशी 150 जनसंख्या असून 10 टक्के नमुना निवडीनुसार प्रत्येक शाळेतील 5 विद्यार्थी म्हणजे 15 विद्यार्थी ही प्रस्तुत लघुसंशोधनासाठी नमुना निवड आहे. (नमुना निवड सरल यादृच्छिक निवड पद्वती : 5,10,15,......................)

## ✸ संशोधन कार्यवाही (Irmplerendafian) :–

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने विद्यार्थ्यांची पूर्व चाचणी घेतली असता असे दिसून आले की चाचणी मधील समाविष्ट 10 विषयांच्या सामान्य ज्ञानाच्या परीक्षेत विद्यार्थी अत्यंत कमकुवत सामान्य ज्ञान असलेले आहेत. विशेष करून विद्यार्थ्यांनी इंग्रजी, विज्ञान, गणित, बुद्विमत्ता या विषयात अत्यंत कमी गुण घेतलेले आहेत. इतर विषयातही विद्यार्थी 50 टक्के गुणांच्या जवळपास आहे. उदा. प्रश्नमंजुषा, शब्दकोडी, भाषिक खेळ,गणितीय संकल्पनांचे उपक्रम, अंताक्षरी, ज्ञानखजिना, ज्ञानमंजीरी, विविध सामान्य ज्ञानावरच आधारीत चलत चित्रपट,यशस्वी तज्ञांचे मार्गदर्शन, असे विविध अपक्रम 15 दिवस आयोजित केले.

15 दिवसानंतर विद्यार्थ्यांना पुन्हा तीच चाचणी देण्यात आली. यावेळी मात्र विद्यार्थी सामान्य ज्ञानात चांगल्या गुणांनुक्रमांनी गुण घेतांना दिसले. 15 दिवसांच्या विविध उपक्रमांच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यामध्ये एक वेगळा आत्मविश्वास वाढलेला संशोधकास दिसून आला.

जे विद्यार्थी गणित, इंग्रजी, विज्ञान, बुद्वधीमत्ता या घटकांत अत्यंत कमी गुण मिळवणारे होते.त्यांना उत्तर चाचणी मध्ये याच विषयांत 80 टक्के च्या वर गुण प्राप्त झालेले दिसले. त्यामुळे हे संशोधन पुर्णतः विविध उपक्रमांच्या सकारात्मक परिणामांची परिणामकारकता सिध्द करण्यात यशस्वी झाले आहे.

LBP PUBLICATION

## विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञानातील पूर्व व उत्तर चाचणी मधील प्राप्त गुणानुक्रम

### तक्ता क्र.01

| अ.क्र. | विषय | जि. प्र. | श्री. चैत्यन्यपुरी विद्यालय, उटवद | चक्रधर स्वामी मा. वि.हिस्वन.ता.जालना | | ऋषी वि.इंग्लीश स्कुल हिस्वन.ता 4020 45 | | % | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Pre | Post | Pre | Post | Pre | Post | Pre | Post |
| 1 | मराठी. | 60 | 135 | 75 | 120 | 60 | 135 | 195 | 390 |
| 2 | ठंग्रजी | 75 | 135 | 60 | 120 | 75 | 135 | 210 | 390 |
| 3 | ठतिहास | 60 | 135 | 90 | 120 | 60 | 150 | 210 | 405 |
| 4 | पर्यावरण | 90 | 135 | 60 | 135 | 75 | 135 | 225 | 405 |
| 5 | विज्ञान | 60 | 120 | 75 | 120 | 75 | 150 | 210 | 390 |
| 6 | तंत्रज्ञान | 105 | 120 | 60 | 120 | 60 | 135 | 225 | 375 |
| 7 | चालु घडामोडी | 75 | 135 | 90 | 135 | 75 | 105 | 240 | 375 |
| 8 | बुध्दीमत्ता | 60 | 120 | 105 | 135 | 105 | 105 | 270 | 360 |
| 9 | गणित | 75 | 105 | 75 | 135 | 75 | 135 | 225 | 375 |
| 10 | तर्कशास्त्र | 60 | 120 | 90 | 135 | 90 | 150 | 240 | 405 |
| एकूण | | 720 | 1260 | 780 | 1275 | 750 | 1335 | 2250 | 3870 |
| टक्केवारी | | 48 % | 84 % | 52 % | 85 % | 50 % | 89 % | 50 % | 86 % |

(प्राथमिक स्त्रोत )

**निष्कर्ष :—**

1. वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, तीन शाळेतील मुलांची 100 गुणांची विविध विषयाची चाचणी घेतली असता Pre Post मध्ये विद्यार्थी संपादणूक 50 टक्के आढळून आली व उत्तर चाचणी मध्ये 86 टक्के आढळून आली.
2. मराठी या विषयात 50 गुणांपैकी अनुक्रमे तीन शाळेतील विद्यार्थ्यांनी पूर्ण चाचणीमध्ये अनुक्रमे 20,25,50 असे एकूण 65 गुण प्राप्त केले व उपक्रमानंतर हेच गुण अनुक्रमे 45,40,45 म्हणजेच एकूण 130 गुण प्राप्त केले.
3. इंग्रजी या विषयात 50 गुणांपैकी अनुक्रमे तिन शाळेतील विद्यार्थीनी पूर्व चाचणीमध्ये अनुक्रमे 25,20,25 असे एकूण 70 गुण प्राप्त केले व उपक्रमानंतर हेच गुण अनुक्रमे 45,40,45 म्हणजेच 130 गुण प्राप्त केले.
4. गणित या विषयात 50 गुणांपैकी अनुक्रमे तिन शाळेतील विद्यार्थ्यांनी पूर्व चाचणीमध्ये अनुक्रमे 25,25,25, असे एकूण 75 गुण प्राप्त केले व उपक्रमानंतर हेच गुण 35,45,45 म्हणजेच एकूण 125 गुण प्राप्त केले.
5. बुध्दिमत्ता या विषयात 50 गुणांपैकी अनुक्रमे तिन शाळेतील विद्यार्थ्यांनी पूर्व चाचणीमध्ये अनुक्रमे एकूण 90 गुण प्राप्त केले व उपक्रमानंतर हेच 40,45,35 असे एकूण 120 गुण प्राप्त केले.

**✸ उपाययोजना:—**

1. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान वाढविण्यासाठी शाळा स्तरावर विविध उपक्रम आयोजित केले जावेत.
2. शालेय स्तरावर विविध विषयांचे अध्यापन करतांना विषयवार सामान्य ज्ञान वाढविण्यासाठी विविध स्पर्धा परीक्षांना पुरक वातावरण तयार करावे.
3. विविध स्पर्धात्मक परीक्षा देण्यासाठी विद्यार्थ्यांना सर्व शिक्षकांनी विशेष मार्गदर्शन वर्ग, तज्ञांचे भाष्य व प्रोत्साहन पर कार्यक्रमांचे आयोजन करावे.

4. विविध स्पर्धा परीक्षांचा सहसबंध आपल्या शालेय विषयाशी लाउन प्रत्येक विषयात विद्यार्थी पारंगत होण्यासाठी विषयावार मार्गदर्शन करावे.

### संदर्भ ग्रंथ :–


1. पंडीत, बन्सी बिहारी.(2009), शिक्षणातील संशोधन, पुणे. नित्य नुतन प्रकाशन.
2. भिंताडे, वि.रा. (2006), शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे. नित्य नुतन प्रकाशन
3. कुंडले, सुरेखा आणि इतर (2009),राम एड संशोधन मार्गदर्शिका भाग 1 व भाग, 2. नाशिक : य.च.म.मु. विद्यापीठ.
4. कुंडले, म.बा. (1996), शैक्षणिक तत्वज्ञान आणि शैक्षणिक समाजशास्त्र, पुणे.: श्री.विद्या प्रकाशन.


LBP PUBLICATION